दिवाणी दावा नंबर ११/२०१२

**वादीतर्फे सा.क्रं.१** निशाणी क्रं.११७ लगत

नांव – अनिता सुधीर उर्फ यशवंत पाटील

नि.क्र.१२० आदेशानुसार प्रतिवादी नंबर ३ विरुध्दचा विना उलटतपासाचा आदेश रद्द केल्यावरुन शपथेवर उलटतपास प्र.नं. ३ तर्फे विधिज्ञ श्री कोठावळे यांच्या वतीने.....

१. मी प्रतिवादी नंबर १ वगैरे यांनी दिलेली कैफियत वाचली आहे. हे म्हणणे खरे आहे की कैफियत नि.क्र.४० मधील कथन म्हणजे परिशिष्ठ अ मधील अनुक्रमांक २ ची मिळकत म्हणजे गट नंबर १४५४/१ मधील ३ गुंठे क्षेत्राची मिळकत दिनांक ०७.११.१९९४ रोजी प्रतिवादी नंबर १ कडुन प्रतिवादी नंबर ११ यांनी खरेदी घेतलेली आहे, हा मजकुर खरा व बरोबर आहे. निशाणी ४० मधील कैफियत मधील कथन म्हणजे गट नंबर १६१२ मधील ३५३ चौरस मिटर मापाची मिळकत ही दिनांक २६.०४.१९९९ रोजी प्रतिवादी नंबर १ कडुन प्रतिवादी नंबर ६ व ७ यांनी खरेदी घेतली आहे किंवा कसे, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी नंबर ४ आप्पाासाहेब जाधव यांनी घर मिळकत विकत घेतली होती किंवा कसे हे मला माहित नाही. त्याचप्रमाणे दिनांक २०.११.१९९८ रोजी घर नंबर ९४२ ची मिळकत प्रतिवादी नंबर ५ यांनी खरेदी घेतली किंवा कसे हे मला माहित नाही. मी कैफियत आल्यानंतर तथाकथीत खरेदीखतांचा प्रती काढलेल्या आहेत. त्या प्रती सदर प्रकरणात दाखल केलेल्या आहेत.

२. हे म्हणणे खरे आहे की माझे सासरे मी लग्न करुन घरी आल्यानंतर म्हणजे सन १९८८ मध्ये पद्मभुषण वसंतदादा कॉलेज, कवठेमहांकाळ येथे लिपीक म्हणुन नोकरीस होते. माझ्या सास–यांना नोकरी कधी लागली याबाबत मला माहिती नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की गट नंबर १४५४ च्या सातबारा उता–यावर सुमारे ५० लोकांची नावे दिसुन येतात. हे म्हणणे खरे आहे की दावा दाखल करतांना

सदर उतारा मी पाहिलेला होता.

प्रश्न – सदर ५० जनांना दाव्याच्या कामी पक्षकार करण्यास कोणती अडचण होती का ?

(सदर प्रश्नास वादीचे विधिज्ञ यांनी प्रतिवादीने त्यांच्या कैफियतमध्ये आवश्यक पक्षकारांची बाधा हा मुद्दा नमुद केला नसल्यामुळे प्रश्न विचारता येणार नाही अशी हरकत घेतली. प्रतिवादी नंबर ३ यांच्या विधिज्ञांनी सदरचा मुद्दा कायदेशिर असल्याने प्रश्न विचारता येईल असा युक्तीवाद मांडला. त्या अनुषंगाने नि.क्र.१०२ वरील दिनांक ०३.०१.२०१८ रोजी काढलेल्या मुद्दयांचा विचार करता त्यामध्ये आवश्यक पक्षकारांची बाधा हा मुद्दा दिसुन येत नाही. त्याचप्रमाणे नि.क्र.४० वरील कैफियतमध्ये सदरचा आक्षेप प्रतिवादीनी नोंदवलेला नाही. त्यामुळे सदर बाबतचा प्रश्न उलटतपासात विचारता येणार नाही. सबब आक्षेप मान्य. )

४. मला दावा मिळकतीतील कोणत्या बाजुचा १/२ हिस्सा मला हवा आहे, हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीच्या चतुःसिमा मला माहिती नसल्यामुळे त्या मी नमुद केलेल्या नाहीत.

५. हे म्हणणे खरे नाही की कवठेमहांकाळ, जत, तासगांव हे दुष्काळी तालुके आहेत. मी सासरी आल्यानंतर माझी नणंद मिनाक्षी हिचा विवाह झालेला नव्हता. मिनाक्षी हिचा विवाह माझ्या लग्नानंतर सन १९९१ साली झाला. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीचे वय माझ्या वयापेक्षा २ वर्षाने जास्त होते. हे म्हणणे खरे नाही की माझे लग्न झाले त्यावेळी माझे सासरे फक्त कमवत होते. हे म्हणणे खरे नाही की घरातील सर्व व्यक्तींची जबाबदारी फक्त माझ्या सास–यांवर होती. हे म्हणणे खरे आहे की २००० साली मी मणेराजुरी येथे माहेरी आले.

६. हे म्हणणे खरे आहे की घर मिळकती या प्रतिवादी नंबर ४ व ५ यांना मी घर सोडण्यापुर्वी विकलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की सदर मिळकती या घर खर्चासाठी व घरची देणी भागवण्यासाठी विक्री केल्या. हे म्हणणे खरे नाही की दावा

मिळकतीपैकी कोणतीही मिळकत प्रतिवादी नंबर ३ याच्या ताब्यात व मालकी हक्कात नाही. गट नंबर १४५४/१ व १६१२ या मिळकती माझ्या सास-यांनी खरेदी केलेल्या होत्या किंवा कसे, याबाबत मला माहिती नाही. सदर मिळकती माझ्या सास-यांकडे कशा आल्या, याबाबतची कागदपत्रे मी काढलेली आहेत. गट नंबर १४५४/१ व १६१२ या मिळकती माझ्या सास-यांना त्यांच्या वडिलांकडुन मिळाल्या हे दाखवण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे सासरे ज्या कॉलेजमध्ये नोकरीस होते, त्या कॉलेजच्या विश्वस्त समितीचे सदस्य होते. गट नंबर १४५४/१ ला सचिव म्हणुन माझ्या सास-यांचे नांव नोंदले आहे किंवा कसे, याबाबत मला माहिती नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की जाधववाडी शिवारातील गट नंबर १६१ यामध्ये प्रतिवादी नंबर ३ यांचा कोणताही मालकी हक्क हितसंबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सास-यांनी त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकतीतील प्लॉट विक्री केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की कवठेमहांकाळ मध्ये सिटी सर्वे झालेला आहे. सिटी सर्वेचे नंबर मी दाव्यात नमुद केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी नंबर ३ यास त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी त्रास देतात यासाठी मी पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील सर्व मजकुर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपासपुर्ण.सरतपास नाही. समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृती.

दिनांक ११.१२.२०१९ (श्रीनिवास अ.कुलकर्णी)

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ